ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 3.8014 (UIF)

REVIEW OF RESEARCH
VOLUME - 6 | ISSUE - 9 | JUNE - 2017

# आण्णाभाऊ साठे यांच्या पोवाड्याचा अभ्यास




**प्रा. श्रीरंग शामराव लोखंडे**
राज्यशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

**गोषवारा –**

आण्णाभाऊंनी विविध साहित्य प्रकार हाताळले यात कथा, कादंबऱ्या, पोवाडे, लावण्या, लोकनाट्ये, पदे, गीते अशी विविध क्षेत्रे त्यांनी सहजगत्या पादाक्रांत केली. आपल्या साहित्यातुन शोषण, अन्याय अत्याचाराला विरोध करणे हेच त्यांनी ध्येय मानले व मानवी वृत्ती, प्रवृत्तीच वास्तव दर्शन घडविले. शब्दांना ज्वालेचे रूप देऊन निर्जीव मनाला चेतवले अशा या लोकशाहीर, साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत अतिशय मोलाचे स्थान आहे. त्यामुळे आण्णाभाऊंचे साहित्य जपणे हे शासनापक्षा सर्व मानव समाजाच कर्तव्य आहे. या कर्तव्याने प्रेरीत होऊन आण्णांनी रचलेल्या पोवाडयाचा चिकीत्सक आढावा प्रस्तुत शोध निबंधातुन घेतला आहे.

**शिर्षक शब्द -** साहित्य, शाहिर, पुरोगामी.

## प्रस्तावना -

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा जन्म 1 ऑगस्ट 1920 रोजी सांगली जिल्ह्यात वाळवा तालुक्यातील वाटेगाव या लहान गावात झाला. पुर्व निरक्षर असलेल आण्णाभाऊ एक शाहीर म्हणून परिचित आहे. तसेच विविध कथा, कादंबऱ्या, पोवाडे, लावण्या, बग, गवळण, प्रवासवर्णन असे सर्व प्रकारचे सशक्त व समृद्ध साहित्य आण्णांनी ताकदीने विकसित केले. आपल्या पोवाडे, लावण्या गीत पद या काव्य प्रकारांचा वापर करून कष्टकरी सामान्य जनतेत विचारांची भावनेची मताची मांडणी करण्याचे धाडस निर्माण केले. ही महाराष्ट्रातील त्यांनी केलेली मोठी जागृती होती. तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती चळवळी मध्ये त्यांनी शाहिरीतुन दिलेले योगदान महत्त्वाचे आहे.

1944 साली त्यांनी लाल बावटा पथक स्थापन केले आणि बघता बघता ते शाहीर झाले. अल्पायुष्यात काळात त्यांनी 21 कथासंग्रह, 30 पक्षा जास्त कादंबऱ्या ही लिहिल्या. शाहीर आण्णाभाऊंनी एकुण 15 पोवाडे लिहिले असल्याची नोंद आढळते. पण प्रत्यक्ष आज 10 पोवाडे उपलब्ध आहे नानकीत नगरापुढे हा पहिला पोवाडा पण आज उपलब्ध नाही. आण्णा भाऊंनी 1942 पासून आपली शाहीरी जनमाणसासमोर ठेवली तेव्हा त्यांना अनंत अडचणी आल्या. मुळात आण्णाभाऊ निरक्षर होते सफाईदारपणे लिहिणे, वाचणे त्यांना कठीण होते. गाइले स्मरणात राहिले असे काही लिखीत पोवाडे सापडणे कठीण आहे जे उपलब्ध आहे त्याचा संक्षिप्त आढावा या शोध निबंधातुन घेतला आहे.

## आण्णाभाऊंचे पोवाडे -

आण्णाभाऊंच्या विविध साहित्य लिखाणातील अत्यंत प्रभावी लोकभावनाना साद दणार लिखाण म्हणजे पोवाडे. पोवाडे हे एक धारदार शस्त्र होते त्याद्वार आण्णांनी दीन दलित, कष्टकरी लोकांच्या अन्यायाला वाचा फोडली. आण्णाभाऊंच्या शाहिरीचा अभ्यास करत असताना त्यांच्या 10 पोवाडया अभ्यास प्रथम करावा लागतो. ते पोवाडे म्हणजे

1) नानकीन नगरापुढ- 1942 उपलब्ध नाही.

2) स्टालीन ग्राडचा पोवाडा- 1942

3) बर्लीनचा पोवाडा- 1946

4)बंगालची हाक- 1944

5) पंजाब दिल्लीचा दंगा- 1947

6)तेलंगणाचा संग्राम- 1947

7) महाराष्ट्राची परंपरा- 1947

8)अमळनेरचे अमर हुतात्म- 1947

9) मुंबईचा कामगार- 1949

10) काळया बाजाराचा पोवाडा- 1949

**नानकीन नगरापुढे** हा आण्णाभाऊंचा पहिला पोवाडा आहे. चीनमध्ये मार्क्सवादी फोजा सशस्त्र उठाव करीत युद्ध तंत्राच्या साहाय्याने चढाई माघारीचा लपंडाव करत नानकीन नगरापुढे पहिला ठसठशीत विजय मिळविला. भाऊंनी भावना प्रधान या पोवाडयात चीनमधील शुर सैनिकांच्या लढ्याचा तपशील देऊन त्यांच्या यशाच गौरवगीत या पोवाडयाच्या रूपाने म्हटले आहे. स्टलीन ग्राडचा पोवाडा आण्णांनी 1942 मध्ये लिहिला रशिया विरोधी हिटरलची नाझी फौज यांच्या युद्धाचा सखोल अभ्यास करून आण्णांनी हा पोवाडा रचला. रशियन सैनिकांच्या लढाऊ झुंजीचा विजयाचा आणि नाझी फौजाचा दारूण पराभवाचा इतिहास ह्या पोवाडयात आण्णांनी तपशिलवार रचलेला दिसून येतो. बर्लिनचा पोवाडा आंतरराष्ट्रीय महायुद्ध या विषयावरचा आहे. रशियन फौजेच्या पराक्रमाचे वर्णन करण्यासाठी त्यांनी हा पोवाडा लिहिला आहे. या पोवाडयात रशियन फौजेचा लढा हा जागतिक लोकशाहीच्या रक्षणासाठी आणि मानवतेच्या मुक्तिगाथेचा इतिहास घडविण्यासाठी चाललेला लढा आहे यांची दखल घेत रशिया मधील जुन्या राजवटीचा पाडाव आणि कम्युनिचा प्रभाव कसा वाढत गेला याचे वणन पावाडयात केले आहे. बंगालची हाक 1944या पोवाडयामध्ये बंगालमध्ये दुष्काळ पडला सर्व जनता उपासमारीने बजार झाली होती. दीन दुबळया लोकांचा अवस्था तर दयनीय बनली होती. राष्ट्रीय नेते तुरूंगात होते तर ब्रिटीशांनी याकडे जाणुन बुजून दुर्लक्ष केले होते. त्यावेळी आण्णांनी नवयुवकामध्ये राष्ट्रीय ऐक्य भावना निर्माण होईल. युवकांच्यात नवचैतन्य निर्माण होईल असा बंगालची हाक त हा पोवाडा रचला जो ऐकल्यावर डोळयांत पाणी उभा राहणार नाही असा माणूस सापडणार नाही असा हृदयस्पर्शी पोवाडा रचुन बंगाल प्रांताला मदत करण्याची प्रेरणा मुंबईकरांना दिली. पंजाब-दिल्लीचा दंगाया पोवाडयात हिंदू मुस्लिम यांच्यात दरी निर्माण करून ब्रिटीशांनी हिंदुस्थानात एक नव संघर्षाच बीज परले होते. या बिजाचे रूपांतर पंजाब-दिल्ली दंगलीत झाले होते. दोन्ही राज्यात दंग्याचा आगडोंब उसळला होता. या दंगलीचे रौद्र रूप पाहून भारताचा स्वातंत्र्य सुर्य या जातीय लढ्यात मावळणार की काय अशी शंका निर्माण झाली होती. तव्हा आण्णांनी अत्यंत मारक, भेदक संवेदनशील शब्दाच्या साहयाने जातीय वाद्यात अडकलेल्या व्यक्ती, राजकीय शक्तींना बाहर पडण्याची विनंती केली. राष्ट्रीय अस्मिता जागी करण्याचा प्रयत्नया पोवाडयातुन केला आहे. समाजवादाचे स्वप्न पाहणार तळमळीच प्रतिभावंत शाहिर होते. या पोवाडय ।तुन त्यांनी सर्व पुरोगामी शक्तींना आवाहन अत्यंत बोलके आणि भावना प्रधान होत.तेलंगणाचा संग्राम हा पोवाडा तेलंगण मधील कष्टकरी जनतेने दिलेल्या अभूतपूर्व लढ्याला साथ देण्याचे आवाहन करणारा पोवाडा आण्णांनी लिहिला होता. वेठबिगारीची पद्धत कुरपण चालवून सामान्य जनतेला गुलाम बनवु पाहणाऱ्या निजामाच्या सत्तविरूद्ध तेलंगणा मधील शोषितांनी जो लढा सुरू केला होता. त्यांना बळ देण्यासाठी निजामाच्या विरोधी जागृती करण्यासाठी तेलंगणाचा संग्राम हा पोवाडा आण्णांनी रचला होता. चाळीस लाख

जनतेच्या मुक्तीचा तो संग्राम होता कष्टकरी माणसांच्या अस्मितचा व आकांक्षचा हा लढा होता. याच सुंदर वर्णन आण्णांनी या तेलंगणाचा संग्राम या पोवाडयात केले आहे.

**महाराष्ट्राची परंपरा**-हा आण्णाभाऊंचा पोवाडा म्हणजे त्यांच्या महाराष्ट्र वरील प्रमाचे महाराष्ट्राच्या परंपरच्या सखोल अभ्यासाचे आणि महाराष्ट्राची परपंरा पुढे नेण्याविषयीच्या तळमळीच प्रयत्न या पोवाडयातुन पुढे येतात. संस्कृती, वाङ्मय, भाषिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, क्रांतिकारी लढा असे महाराष्ट्राचे पैलु त्यांनी या पोवाडयातुन साकारले आहे. अमळनेरचे अमर हुतात्मे हा अमळनेरच्या हत्याकांडावर प्रकाश टाकणारा पोवाडा आहे. अमळनेर मिल मधील मालक कामगार संघर्ष आणि यातुन जो गोळीबार झाला. त्यात 9 कामगार ठार झाले. अनेक कामगार जखमी झाले. या गोळीबाराने महाराष्ट्र काय भारतीय कायदे मंडळ, पेटून उठले होते. या गोळीबाराचे दुरगामी परिणाम समाजाला भोगावे लागले होते. त्या अमळनेरचे हुतात्मे व वर्ग संघर्ष यांचा आशय या पोवाडयात आण्णांनी अत्यंत भेदक शब्दात मांडला आहे. मुंबईचा गिरणी कामगार हा पोवा। म्हणजे मुंबईच्या गिरणी कामगारांचा ज्वलंत इतिहास आहे. 1908 मध्ये टिळकांना अटक झाल्श्यानंतर मुंबईच्या गिरणी कामगारांनी उचललेली कोधाची पावले, कामगार चळवळी, कामगार युनियन, कामगारांचा संप, संपात हुतात्मा झालेले कामगार, भांडवलशाहीला विरोध करण्यासाठी मुंबईच्या कामगाराने उचलेले लढ्याचे पाऊल हा सारा मुंबईच्या कामगारांचा इतिहास या पोवाडयात लिहिला आहे.

### काळया बाजाराचा पोवाडा -

या पोवाडयात आण्णाभाऊंनी गरीबी श्रीमंती भेद, नफेखोरी, काळा बाजार याच खर चित्र उभे केले आहे. हे आज ही ताज वाटते. या पोवाडयात आण्णांनी जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा काळा बाजारवाले कसे करतात, राज्यशासन याला पोषक असे वातावरण कसे उभे करते याचे दर्शन घडविले आहे. तसेच शोषण मुक्तीचे रणयुद्ध पटविण्याचे आव्हान केले आहे.

### आण्णा भाऊंच्या पोवाडा पोवाडयाचे चिकीत्सक विश्लेषण -

उपलब्ध असलेल्या 10 पोवाडयाचा चिकित्सक अभ्यास करता असे लक्षात येते की आण्णाभाऊंच पोवाडे म्हणजे पुरोगामी साहित्य विचारांवर प्रकाश | टाकणार होत. नानकीन नगरापुढे, स्टालिन ग्राडचा पोवाडा, बर्लिनचा पोवाडा हे | तीन पोवाडे आंतरराष्ट्रीय युद्धाची विजय गाथा सांगणार होते. तसेच कम्युनिस्ट | चळवळीच्या विजया बदल आनंद व्यक्त करणार पोवाडे होते. मार्क्सवादी विचारांचा । प्रसार करणार असे होते. बंगालची हाक, तेलंगणाचा उठाव पंजाब दिल्लीचा दंगा हे तीन पोवाडे अंतर्गत उठाव, अन्यायाचा निषेध व कृतिशील समाज बनविण्याचे आवाहन या पोवाडयातुन केले आहे. तसेच समाजवाद आणि राष्ट्रीय एकात्मतेला । दृढ करणार हे पोवाडे आहे. अमळनेरच अमर हुतात्मे आणि मुंबईचा गिरणी कामगार हे दोन पोवाडे महाराष्ट्रातील साम्यवादी लढ्याचे आणि परंपरेचे दर्शन घडविणार आहे. सामाजिक बांधिलकी व समाज वास्तवाचे चित्रण करणार हे पोवाडे आहे. बंगालची हाक हा पोवाडा आंतरराष्ट्रीय संबध कसे वाढतील यावर भर दणारा पोवाडा आहे. काळया बाजाराचा पोवाडा आधुनिक समस्येच चित्र उभे करणारा असा आहे.

महाराष्ट्राची परंपरा हा आण्णाभाऊंचा सर्वोत्कृष्ठ पोवाडा आहे कारण नव्या पिढ्यांना सतत प्रेरणा देणारा असा आहे. पोवाडयांची भाषा शैली, रचना, अपेक्षित तो परिणाम साधणारी अशी आहे. जुन्या पारंपारिक व नव तत्वज्ञान याचा योग्य ताळमेळ बसणार पोवाडे आण्णा भाऊंनी लिहीले आहे. आण्णाभाऊंचे पोवाडे समाजनिष्ठआहत समाज पुरूषांच्या संघर्षाच जिवंत चित्र यामध्ये आहे. सामाजिक अन्याय याविरूद्ध आण्णाभाऊंनी विचारपूर्वक मांडलेले विचार वर्गीय समाज लढा हेच आण्णाभाऊंच्या पोवाडयाच विषय होते. साम्यवादी, मार्क्सवादी आणि वर्गीय दृष्टीचा पुरस्कार करणार लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व त्याचे पोवाडे होत.

### समारोप -

आण्णाभाऊंनी 1942 ते 1969 अखेर पोवाडे व लावण्या लिहिल्या. आण्णाभाऊ हे लोकातले साहित्यिक असल्याने त्यांच्या पोवाडयांना जनभावनेच्या आणि जन आंदोलनाचा संदर्भ आहे. मराठी साहित्यात अनेक साहित्यिक कवी झाले आणि होतील पण आधुनिक मराठीतील पुरोगामी विज्ञाननिष्ठ साहित्यिक आण्णाभाऊ आहेत आणि राहणार यात शंका नाही.

**संदर्भ सुची -**

1) बी. आर. भोसले- 'आण्णाभाऊ साठे मराठी समाजविचारांचे आणि साहित्याचे विवचन', पीएच. डी. शोधप्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर 1984 पान नं-177 ते 190

2) जोखे विजयकुमार 'आण्णाभाऊ साठे चरित्र आणि कार्य, नाग-नालंदा ' प्रकाशन 2004

3) साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती विशेष लेख लोकसत्ता दैनंदिन पेपर 1 ऑगस्ट, 2016

4)आण्णाभाऊ साठे एक जबरदस्त साहित्यिक दैनंदिन प्रहार पेपर 18 जुलै 2016

5) लोकशाहीर आण्णाभाऊ साठे ऑनलाईन मराठी अनलिमिटेड वेबसाईट